ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN


An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

Peer Reviewed Refered
and UGC Listed Journal

Volume - VII, Issue - III, July - September - 2018
ISSN 2277 - 5730


# AJANTA


Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)


Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. डॉ. कविता साळुंके

An Recognation of the Publication of the Paper Entitled

१५ ऑगस्ट संदर्भात युवकांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास


Ajanta Prakashan
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com


Editor : Vinay S. Hatole



Scanned with CamScanner

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VII, Issue-III
July - September - 2018
Marathi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

# ३४. १५ ऑगस्ट संदर्भात युवकांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास

प्रा. डॉ. कविता साळुंके
सहयोगी प्राध्यापक, संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक
कु. ज्योती लष्करी
संशोधक विद्यार्थी, संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक

**सारांश**

१५ ऑगस्ट १९४७ या दिवसाचे भारताच्या दृष्टीने एक वेगळे महत्त्व आहे.कारण या दिवशी भारताला स्वांतत्र्य मिळाले ब्रिटिशांचा अंमलाखाली असलेल्या भारताच्या स्वांतत्र्य सैनिकांनी प्रयत्नपूर्वक व चिकटीने केलेली सुटका म्हणून हा राष्ट्रीय सण साजरा केला जातो.

भारतात स्वातंत्र्यानंतर संविधान तयार करण्यात आले.त्या संविधानाने प्रत्येक व्यक्तीला आपल्या कर्तव्याची जाणीव देऊन अधिकार व जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या.स्वातंत्र्यानंतर भारताचा राष्ट्रध्वज तयार करण्यात आला.त्या राष्ट्रध्वजात वापरलेले रंग व अशोध चक्र याचे एक वेगळे माहत्म्य आहे.१५ ऑगस्ट हा दिवस आज पासून ६० वर्षापूर्वी ही साजरा केला जात होता.आणि आज ही आपला राष्ट्रीय सण साजरा केला जातो.पूर्वी हा सण साजरा करत असतांना लोकांचा भावना आणि आज १५ ऑगस्ट संदर्भात असणाऱ्या भावना यात खुप बदल झालेला जाणवतो.हा बदल नेमका काय आहे? युवकांच्या १५ ऑगस्ट दिना संदर्भात त्याल नेमक्या भावना कोणत्या आणि त्या भावना का निर्माण झाल्या या संदर्भातला अभ्यास या संशोधन पेपरसाठी करण्यात आला हा पेपर लिहतांना भाग ०१ मध्ये सैध्दांतिक माहिती भाग ०२ मध्ये केलेले संशोधन आणि प्राप्त झालेल्या संशोधन निष्कर्षांची मांडणी केलेली आहे.आणि ती पेपर मध्ये सविस्तर पणे मांडण्यात आली आहे.

**प्रस्तावना**

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशी भारताला स्वातंत्र्य मिळाले.देशाला कसे स्वातंत्र्य मिळाले या विषयीचा आढावा घेतला तर त्यात खुप परिश्रम दिसतात.१७५७ रोजी प्लासीची लढाई आणि १७६४ या बॉक्सर युध्दनंतर भारताची परिस्थिती बदलली.कारण या आधीच भारतात इस्टइंडिया कंपनीची स्थापना झालेली होती आणि बॉक्सर युध्द हरल्याने इंग्रजांना भारतात घट्ट पाया रोवण्यास सुरुवात केली.

भारतात १८५७ रोजी महान क्रांतिची सुरुवातझाली. आणि यानंतर १८५८ रोजी भारतातील काही कंपन्यांची मक्तेदारी इंग्राजांनी घेतली त्यावेळी म. गांधीजीनी सविनय कायदेभंग चळवळ उभारून इंग्रजांना विरोध करण्याचा प्रयत्न केला व याचवेळी १८८५ मध्येभारतात राष्ट्रीय काँग्रेस पार्टीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १९२९ रोजी रावि नदीच्या काठी प्रथम संपूर्ण स्वराज्याची मागणी करण्यात आली तो दिवस होता २६ जानेवारी १९२९भारताला स्वातंत्र्य मिळवून



२१

Scanned with CamScanner

VOLUME - VII, ISSUE - III – JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

देण्यासाठी भारतात जहाल मवाळ असे दोन गट तयार झाले यात नेताजी सुभाषचंद्र बोस,लोकमान्य टिळक,स्वातंत्र्यवीर सावरकर, म.गांधी, लालालजपत रॉय ,भगतसिंग,राजगुरु,-सुखदेव अशा महान देशभक्ताचा समावेश होता.या देशभक्तांच्या बलिदानामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले.या स्वातंत्र्य दिवसाचे एक वेगळे महत्त्व आहे कारण यात लाखो भारतीय आणि क्रांतीकारी व्यक्तींनी आपले योगदान दिले आहे.प्रत्येक देशभक्त आपल्या स्वतःच्या देशाविषयी घोषण करित होते.त्या घोषणा आज ही आपल्या अंगावर शहारे आणतात.उदा.'भगतसिंह इन्कलाब जिंदाबाद','भारत छोडो'महत्मा गांधी,'तुम मुझे खुन दो मे तुमे आझादी दुंगा' सुभाषचंद्र बोस अश्या विविध घोषणा देते व इंग्रजांशी संघर्ष करत ते शहीद झालेत व देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले जगाचा निरोप घेत शेवटी म्हटले "हम लाये है तुफान से किश्ती निकालकर इस देश को रखना मेरे बच्चो सम्भांलकर" पण आज युवा पिढीला याचे गांभीर्य आहे का?हे जाणून घेण्याची वेळी आली आहे असे वाटते.

**१५ ऑगस्टच इतिहास**

लॉर्ड माउँटबौटन १५ ऑगस्ट या तारेखेला शुभमानत असे कारण असे की दुसर महायुध्दाच्या वेळी १५ ऑगस्ट १९४५ ला जपानच्या आर्मीने आत्मसमर्पण केले होते.त्यावेळी लॉर्ड माउंट बैटन हे अलाइड फोर्से चे कमांडर होते.म्हणून या त्या दिवसचा स्मरणार्थ १४ ऑगस्ट ठिक रात्री १२ वाजता म्हणजेच १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र देण्यात आले. व देशाचा ध्वज म्हणजे तिरंगा लालकिल्ल्यावर फडकविण्यात आला.

**राष्ट्रध्वजाचा इतिहास**

भारताचे स्वातंत्र्य समोर दिसत असताना घटना समितीच्या सभेत पंडित जवाहरलाल नेहरु यांनी २२ जूलै१९४७ रोजी स्वातंत्र्याचा ध्वज भारतासह जगासमोर फडकावले.हा दिवस ध्वजाचा जन्मदिवस म्हणता येईल.या तिरंग्याला भारताचा राष्ट्रध्वज म्हणून स्वीकरण्यात आले.यावेळी पंडित नेहरू यांनी केलेले भाषण आतिशय मार्मिक असे होते.या पूर्वी २३ जून १९४७ ला ध्वजाचे स्वरूप ठरविण्यासाठी तात्पुरती समिती स्थापन करण्यात आली.डॉ.राजेंद्रप्रसाद त्याचे अध्यक्ष होते.समितीत मौलाना अब्दूल कलाम आझाद,के.एम.पणिक्कर,श्रीमती सरोजिनी नायडू,के.एम.मुन्शी,चक्रवर्ती राजगोपालचारी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश होता.यावेळी सविस्तर चर्चा करुन राष्ट्रध्वजाचे स्वरुप ठरविण्यात आले.ध्वजाचा रंग,रुप,आकार,मान-सन्मान,फडकावण्याचे निकष आदी ठरविण्यात आले.यासंदर्भात १८ जूलै १९४७ आंतिम निर्णय घेण्यात आला.त्यानंतर घटना समितीत त्याला मान्यता मिळावी म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांना तो सादर करण्यास सांगण्यात आले.त्यानंतर त्यांनी तो सादर केला.स्वातंत्र्यासाठी योगदान देणाऱ्या हुतात्म्यांच्या रक्ताचा रंग ही ध्वजात समाविष्ट करण्यात आला.

**तिरंग्याच्या जन्म**

स्वातंत्र्य संग्रामात आपली आहूती देणाऱ्यांमुळे या तिरंग्याचा जन्म झाला.चौदा ऑगस्ट १९४७ ला रात्री पावणेदहा वाजता कौन्सिल हाऊसवर सुचेता कृपलानी यांच्या नेतृत्वाखाली वंदे मातरमच्या गायनाने कार्यक्रमाला सुरवात झाली.घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद व पं.जवाहरलाल नेहरु यांची भाषणे झाली.त्यानंतर हंसाबेन मेहता यांनी अध्यक्ष राजेंद्रप्रसाद



Scanned with CamScanner

यांना रेशमी कापडाचा ध्वज दिला आणि त्यांना सांगितले,की स्वतंत्र भारतात या सदनात जो राष्ट्रध्वज फडकावला जाईल तो भारतीय माहिलांकडून देशाला दिलेली ही भेट असेल.तो ध्वज सर्व लोकांसमोर पहिल्यांदा सादर करण्यात आला [illegible] जहॉ से अच्छा आणि 'जन गण मन' यांच्या सामूहिक गायनानंतर हा कार्यक्रम संपला. राष्ट्रध्वज निर्मितीचे [illegible] करण्यात आले.भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा असेल.त्याचा आकार आयाताकार असून त्याची लांबी व रुंदीचे प्रमाण [illegible] राहिल.तीन रंगांच्या पट्ट्या सरळ असतील.सर्वात वर केशरी,मध्ये पांढरा आणि खाली हिरव्या रंगाची पट्टी असेल.पांढऱ्या रंगाच्या पट्टीवर मध्ये सारनाथ येथील अशोक स्तंभावरील चोवीस आऱ्या असणारे चक्र असेल.त्याचा व्यास पांढऱ्या रंगाच्या पट्टीच्या रुंदीएवढा असेल.राष्ट्रध्वज तयार करण्यासाठी वस्त्र खादीचे असेल.

**राष्ट्रध्वज तयार करण्यासाठी वस्त्र**

राष्ट्रध्वज तयार करण्यासाठी वस्त्र सूती,रेशमी वस्त्रही चालेल.पण हे सूत हाताने कातले पाहिजे.चरख्याचा वापर येथे अपेक्षित आहे.शिवण्यासाठी केवळ खादीच्या धाग्यांचा उपयोग होईल.नियमानुसार खादीचा एक वर्ग फूट कपडयाचे वजन २०५ ग्रॅम व्हायला हवे.राष्ट्रध्वज साठी हाताने तयार केलेल्या खादीचे उत्पादन स्वातंत्र्य सेनानींच्या गरग नावाच्या गावत केले जाते.उत्तर कर्नाटक जिल्हयात बंगळूर-पुणे रस्त्यावर हे गाव आहे.येथे या केंद्रांची स्थापना १९५४ मध्ये करण्यात आली.मात्र आता शहाजानपूर येथील ऑर्डिनेन्स क्योरिंग फॅक्टरी,खादी ग्रामोद्योग आयोग दिल्ली येथेही राष्ट्रध्वजाचे उत्पादन होऊ लागले आहे.राष्ट्रध्वज निर्मिती खासगी तत्वावरही होऊ शकतो.मात्र,राष्ट्रध्वजाचा मानसन्मान राखला गेला पाहिजे.त्यासाठी आयएसआय मार्क हवा.राष्ट्रध्वजातील रंगांचे स्वरुप स्पष्ट आहे.लाल रंग साहस आणि बलिदानाचे,पांढरा सत्य आणि शांतीचे आणि हिरवा रंग श्रध्दा आणि शौर्याचे प्रतीक आहे.चोवीस आऱ्याचे निळया रंगाचे चक्र २४ तास सतत प्रगतीचे प्रतीक आहे.प्रगतीही कशी तर निळया अनंत आकाशासारखी किंवा निऴया अथांग सागरासारखी.

**पहिल्या दहावर्षातील १५ ऑगस्ट साजरा करण्याचा उत्साह**

अश्या या तिरंगी ध्वजाला सलामी देते, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतीय जनतेकडे इग्रंजानी राजकीय सुत्रे दिली आणि तेव्हापासून हा दिवस मोठया उत्साहाने संपूर्ण भारतात उत्साहाने साजरा केला जातो. पहिल्या दहा वर्षात मोठया उत्साहाने हा दिवस साजरा केला जात होता.शाळेला सुट्टी दिली जात नव्हती दिवसभर कार्यक्रम घेतले जात असे. शाळा,महाविद्यालयातून प्रभात फेरी निघत असे.शाळेतील विद्यार्थ्यांना या दिवसाचे महत्त्व सांगितले जाई.शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप ,गोड पदार्थ वाटप केले जात असे.एकमेंकाना मिठाई भरवून शुभेच्छा दिल्या जात असत.या दिवशी ज्या विरांनी देशाला स्वातंत्र मिळवून देण्यासाठी बलिदान दिले यांचे स्मरण करुन त्यांना श्रध्दांजली वाहीली जाते ते एतिहासिक प्रसंग नाटकाच्या स्वरुपात शाळेतून विद्यार्थ्यांकडुन करुन घेतले जात असत.शाळेतील विद्यार्थी व शिक्षक हे देखील स्वच्छेने मोठया संख्येने उपस्थिती राहत .मात्र आजचे १५ ऑगस्ट साजरा करण्याचे स्वरुप पूर्णपणे बदललेले आहे. आज जे केले जाते ते फक्त प्रकाशझोतात येण्यासाठी असे वाटते.



३०

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

**१५ ऑगस्ट हा उत्सव कसा साजरा केला जातो.**

प्रथम १४ ऑगस्टला संध्याकाळी महामहिम राष्ट्रपती यांचे भाषण होते नंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधानांचा हस्ते ध्वजारोहन करुन तोफाची सलामी दिली जाते यावेळी या दिवशी संपूर्ण देशभर सर्व सार्वजनिक ठिकाणी,व शालेय स्तरावर १५ ऑगस्ट हा उत्सव साजरा केला जातो.सकाळी ठिक ७.३० मी. ध्वजारोहन केले जाते.आता स्त्री-पुरूष समानता असल्याने माहिले मार्फत ध्वजारोहन केले जात आहे.सुरुवातीला ध्वजाची पुजा करुन ध्वजारोहन करुन ध्वजाला सलामी देत राष्ट्रगीत म्हटले जाते व त्यानंतर विविध गीत गायन भाषणे घेतली जातात.काही शाळेत या दिवशी विविध स्पर्धा घेतल्या जातात जसे 'वाद विवाद स्पर्धा' 'वृकृत्व स्पर्धा','रांगोळी स्पर्धा' किंवा सांस्कृती कार्यक्रम इ.

महाविद्यालयात देखील ७:३० वाजता ध्वजारोहन केले जाते महाविद्यालयात देखील विविध स्पर्ध घेतल्या जातात यात नवनवीन विषयांचा समावेश असतो.जसे ७० वर्षात देशांने केलेली प्रगती,मिळालेले स्वातत्र कसे टिकवून ठेवता येईल.युवकांची भूमीका, नव्या युगाचा भारत अशा विविध विषयाचा यात समावेश असतो. मात्र ही स्थिती देखील फक्त मागील २० वर्षापर्यंत होती हे सांगणे वावगे ठरणार नाही.

गावातील शहारातील पोलिस खात्यात,वनसंरक्षण खात्यात देखील ध्वजारोहनाचा कार्यक्रम घेतला जातो.विविध देशभक्तीपर गीत वाजविले जातात.बंदुकिच्या गोळीने ध्वजाला सलामी दिली जाते.पंचायत समिती असो ग्रामपंचायत,महानगरपालिका येथेही गावातील जेष्ठ व्यक्तींच्या हस्ते ध्वजारोहन करून गावातील समस्या आढावा घेतला जातो.विविध भाषणे केली जातात.विविध NGO मार्फत १५ ऑगस्ट रोजी बालिका आश्रम,अनाथ आश्रम,दवाखाना यात मोफत उपाचार व रक्तदान शिबीर ,मोफत पुस्तक वाटप,कपडे वाटप, दप्तर वाटप, सायकल वाटप करुन कार्यक्रम घेतले जातात.देशातील जनतेला स्वत:चे बलिदान देणाऱ्या वीरांची आठवण करुन त्या देशभक्तांना सलामी देण्यासाठी हा सण मोठया उत्साहाने साजरा केला जातो.

**१५ ऑगस्ट कोणासाठी ?**

१५ ऑगस्ट हा उत्सव भारत देशातील सर्व जनतेसाठी आहे.अगदी लहान वयातील बालक ते प्रौढ व्यक्ती या दिवशी होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होतात.शैक्षणिक क्षेत्रातील कर्मचारी पासून गावातील व्यापरी,शेतकरी, स्त्री-पुरुष देखील यात सामिल होतात.अशिक्षित-शिक्षित दिव्यांग व्यक्ती देखील उपस्थित असतात.

**१५ ऑगस्ट चे महत्त्व**

- राष्ट्रीय एकात्मता निर्मिण करण्यासाठी
- स्वातंत्र्यपूर्व इतिहासाची जाणीव होण्यासाठी
- महान देशभक्ताची ,समाजसुधारकांच्या कार्याची जाणीव जनतेला करुन देण्यासाठी
- मिळालेले स्वातंत्र टिकवून ठेवण्यासाठी
- भूतकाळात झालेल्या चुकांचे पून्ह चक्रीकरण न होण्यासाठी



Scanned with CamScanner

१५ ऑगस्ट उत्साव हा आपण मोठया उत्साहाने साजरा करतो हे नक्कीच पण...

आजच्या परिस्थितीचा विचार करता भारतातील युवकांमध्ये या दिवसाचे महत्त्व कमी होतांना दिसते शाळा व महाविद्यालयात देखील या दिवशी शिक्षक विद्यार्थी यांची संख्या कमी होतांना दिसते.१५ ऑगस्टला सुट्टी दिली जाते.आज वेगळया पध्दीने तो साजरा केला जातो.विविध प्रकारच्या पार्टी केल्या जातात.शाळेत विविध संस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन कमी प्रमाणात असते.काही ठिकाणी निबंध स्पर्धा घेतल्या जातात पण त्यानिबंध स्पर्धातील विषयआज बदललेदिसता आहे.शिक्षक किंवा कोणतेही कर्मचारी ज्या ठिकाणी ते नोकरीला आहेत त्या ठिकाणी त्या दिवशी थांबतातच असे नाही. दररोज अपडाऊन करणारे प्राध्यापक कर्मचारी राहत्यागावाचे उपस्थितीपत्रक दिले की झाले असे मानतात. तसेच १५ ऑगस्ट रोजी जोडून सुट्टी आली तर अजून संख्या कमी होते.असे का घडते याचा अभ्यास या पेपरमध्ये केला आहे.

भाग ०२

संशोधन कार्य

**संशोधन शीर्ष :१५ ऑगस्ट संदर्भात युवाकांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास**

**उद्दिष्टे**

१५ ऑगस्ट च्या संदर्भात सैध्दांतिक बाजूच्या अभ्यास करणे.

१५ ऑगस्टच्या संदर्भात युवकांचा भावनांचा शोध घेणे.

१५ ऑगस्टच्या संदर्भात युवकांचा भावनांची चिकित्सा करणे.

**गृहितक**

१५ ऑगस्ट उत्साव शाळा,महाविद्यालय संस्था ,NGO येथे साजरा केला जातो.

१५ ऑगस्ट संदर्भात युवक फारसे गंभीर नसतात.

**संशोधन प्रश्न**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतीय परिस्थिती काय होती.?

स्वातंत्र्योत्तर पहिल्या १० वर्षात १५ ऑगस्ट कसा साजरा केला जात होता?

१५ ऑगस्ट उत्सव साजराकरण्यासाठी आजची परिस्थिती काय आहे?

१५ ऑगस्ट संदर्भात आजच्या युवकांच्या भावना काय आहे?

१५ ऑगस्ट संदर्भात युवक फारसे गंभीर नसल्याची करणे काय असावी?

**संशोधन पध्दती**

संशोधन कार्योसाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.



Scanned with CamScanner

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

**न्यादर्श**

असंख्याव्य नमूना निवड प्रकारातील सहेतूक पध्दतीने १५० विद्यार्थी निवडण्यात आले.त्यातील १०% विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या.दोन प्राचार्य व पाच प्राध्यापक सहेतूक पध्दतीने निवडण्यात आले.

**साधन**

विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली व मुलाखत आणि ,प्राचार्यव ५ प्राध्यापकांसाठी मुलाखत हे साधन वापण्यात आले आहे.

**कार्यपध्दती**

सदर प्रश्नांचा शोध घेण्यासाठी १५ ऑगस्टच्या इतिहासाचा अभ्यास केला.देशाचा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर परिस्थिती कशी होती .१५ ऑगस्ट साजरा करण्याचा पध्दतीत कसा बदल होत गेला आहे त्याचे वर्णन भाग ०१ मध्ये केले १५ ऑगस्ट या दिवसाबद्दल मत जाणून घेण्यासाठी सहेतूक पध्दतीने १५० विद्यार्थी न्यादर्श म्हणून निवड केली. २० प्रश्नांची प्रश्नावली तयार करुन १५० विद्यार्थ्यांकडून भरून घेतली व महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राचार्य यांची मुलाखत घेण्यात आली त्यांनी दिलेल्या प्रतिक्रिया यांची नोंद घेऊन खालील प्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले आहे.

**निष्कर्ष**

- ८०% विद्यार्थ्यांच्या मते स्वातंत्र्यदिन तिरंगी ध्वजापूढे अभिवादन केले की आपली इतिकर्तव्य संपली अशी मनोधारणा झालेल्या पुढाऱ्यांचे काय करणार ? लोकशाही मध्ये जनता हीच खरी मालक असते हेच हे राजकारणी विसरत चालले आहेत.देशावर प्रेम म्हणजे भ्रष्ट्राचार करणे,हिंसाचार करणे,प्रमाणिकपणे भष्ट्राचार,हिंसाचार न करणे प्रमाणिक वागणेच्या गोष्टी मनावर ठसणे आवश्यक असतांना आजच्या काळात देशभक्तीचीच तीव्र टंचाई निर्माण झाल्याचे दिसून येते आहे प्रत्येक भारतीयाने आपल्या देशावर सदासर्वकाळ प्रेम केले पाहिजे देशावर प्रेम म्हणजे काय येथील परंपरा,संस्कार आणि सर्वसामान्य लोकावरही प्रेम करणे आलेच.
- ७०% विद्यार्थ्यांचा मते १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी,भारत ब्रिटीशांच्या जोखडयापासून स्वतंत्र झाला असला तरी त्याची जागा आज भष्ट्राचार व हिंसाचार अप्रामाणिकपणा यांनी घेतली आहे.
- ८५% विद्यार्थ्यांच्या मते शिक्षक व प्राध्यापक सध्या निरुत्साही झाले आहेत.फक्त वर्षातून एकदा कार्याक्रम घेतले जातात.
- भारताच्या संविधाना विषयी इतिहास विषयाचे विद्यार्थी वगळता ५०% विद्यार्थ्यांना संविधान माहित नाही.
- ५०% शिक्षकांच्या मते विद्यार्थ्यांनमध्ये भारतीय इतिहासाविषयी अथवा देशभक्तांच्या कार्याविषय जाणीव जागृती केली जात नाही.



Scanned with CamScanner

VOLUME - VII, ISSUE - III -- JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

- ७०% प्राध्यापकांच्या मते १५ ऑगस्ट या दिवसा विषयीची सक्ती केली जात नाही.तुम्ही आहे त्या गावात उपस्थित राहून कुठल्याही शाळेचा,ग्रामपंचायतची उपस्थिती प्रमाणपत्र दिल्यामुळे याचे महत्त्व कमी होत चालले आहे.
- १५ ऑगस्ट या दिवशी फक्त ध्वजारोहन झाल की संपले अस न करता.संपूर्ण दिवस भर कार्यक्रमाचे आयोजन करणे महत्त्वाचे आहे.
- ४०% प्राध्यापकांच्या मते प्राध्यापकांचे दररोज होणारे अपडाऊन हया मुळे देखील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे १५ ऑगस्ट दुर्लक्ष केले जाते.
- ४०% प्राध्यापकांचा मते विद्यार्थी सेवा संघटनेमुळे देखील प्राध्यापकांना योग्य ते निर्णय घेता येत नाही.
- ४०% शालेय कामकाजात वाढता राजकीय हस्तक्षेप युवकांमधील राष्ट्रपेम कमी करण्यास करणीभूम ठरु शकतो त्यांचा राष्ट्रप्रेम ऐवजी विशिष्ट पक्ष प्रेम वाढीस लागत आहे.
- १०% प्राध्यापकांच्या मते प्रत्येक युवकांमधील आपपले व्यक्ती ठरवून जयंती व पूण्यतिथि साजरी करण्याची पध्दत ही युवकांमध्ये राष्ट्रप्रेम कमी करण्यास मोठया प्रमाणावर करणीभूत ठरत आहे.

**मुलाखती व्दारे मिळालेल्या निष्कर्षा आधारे संशोधन प्रश्नांची चर्चा पुढील प्रमाणे करता येईल.**

स्वातंत्र्योपूर्व काळात इंग्रजांकडून होणारे अत्याचार लादले जाणारे कर समाजात निर्माण झालेली वर्गवारी यामुळे सर्वसामान्यजनतेसह सर्व नेते स्वांतत्र्याच्या प्रेरणेने पेटून उठलेले दिसत होते.प्रत्येक नेता आपल्या विचार सरणी नुसार त्यासंदर्भात पाऊल उचलित होता.

स्वातंत्र्योत्तर भारतीय परिस्थिती सुरुवातीचा २०वर्षोत स्वातंत्र्यासाठी दिलेल्या बलिदानाची प्रत्येक व्यक्तीला जाणीव होती त्याचे गांर्भीय प्रत्येकाच्या वागण्या बोलण्यातून दिसत होते, राष्ट्रप्रेम,राष्ट्रभक्ती,भक्तींचे मुल्य उच्च स्तरावरचे होते त्यामुळे १५ ऑगस्ट २६ जानेवारी साजरेकरण्या संदर्भातला प्रत्येकाचा जल्लोश प्रचंड प्रमाणात होता.मात्र आलिकडच्या काळात १५ ऑगस्ट संदर्भातील उपस्थिती संदर्भातील अंत:प्रेरणा तुलनेने कमी झालेली दिसते.

स्वांतत्र्यानंतर पहिल्या १० वर्षात १५ ऑगस्ट प्रत्येक गावात समाजात शाळेमध्ये शिक्षक व विद्यार्थी,सरकारी कार्यलयात शासकिय अधिकारी व त्याचे कुटुंबिय अत्यंत उत्साहाने प्रेरणेने १५ ऑगस्ट साजरा करत यासाठी कोणत्याही प्रकारचे शिक्षा वजा परिपत्रक उपस्थितीसाठी काढावे लागत नव्हते सुरुवातीला देशभक्ती गिते त्यानंतर राष्ट्रध्वज फडकविणे,उपस्थितींना बिस्किटे पुडे व पेढे देवुन प्रत्येकाला गोडाचा आस्वाद देणे त्यानंतर प्रभातफेरी,भाषण स्वातंत्र्यासंदर्भातील विविध घटनांचे नाटयीकरण करुन संपूर्ण दिवस या कार्यक्रमाने व्यापलेला असे प्रत्येक नागरिक १५ ऑगस्टला गोडधोड करून आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा आनंद साजरा करीत असे



३५

Scanned with CamScanner

VOLUME - VII, ISSUE - III -- JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

आज १५ ऑगस्ट साजरा करतांना गावात,पारावर,शाळेत सर्वग्रामीण जनता उपस्थित असते असे नाही.सरकारी कार्यालय व शाळांमध्ये १५ ऑगस्टला उपस्थिती अनिवार्यतेचे परिपत्रक काढून उपस्थिती मिळविली जाते.याही परिस्थितीत झेंडावंदना नंतरच्या सुट्टीचा आस्वाद घेण्यासाठी शिक्षक विद्यार्थी शासकिय अधिकारी विविध कारणांचा शोध घेवून आपल्या अनुउपस्थितीचे स्पष्टीकरण देतात आणि कुटुंबासमवेत बाहेर फिरायला जाण्याची मज्जा घेतात आज केवळ औपचारिकता म्हणून ध्वजारोहन करण्याकडे कल दिसतो.स्वातत्र्याचे मुल्य म्हणावे तसे गांभीर्यपूर्वक असलेले दिसत नाही.शासकिय स्तरावर विविध कार्यक्रमाच्या आयोजनातील भावनां व मूल्यांपेक्षा त्याची प्रसिध्दी त्याचे सादरीकरणातील भव्यता प्रत्येक अधिकाऱ्याचे मान-पान या गोष्टींना महत्व दिलेले दिसते.

युवकांसमवेत स्वातंत्र्य मिळविण्यासाठी बलिदान देणाऱ्या नेत्यांन संदर्भात चर्चा केली असता त्यांना त्यांची नावे कार्य माहिती नसल्याचे आढळते अश्या परिस्थिती मध्ये बलिदान देणाऱ्या स्वांतत्र्यविरांचे गांभीर्य त्यांना कसे असणार, युवकांना स्वातंत्र्य व पारातंत्र्य यातील मुलभूत भेदाचे ही स्पष्टीकरण नसलेले दिसते. स्वातंत्र्या बद्दलच्या संकल्पना ही चुकीचा आढळतात.वैयक्तीक स्वातंत्र्यापुढे समाजाचा हिताची पर्वा त्यांना महत्वाची वाटत नाही.

१५ ऑगस्ट सरकारने निश्चित केलेला राष्ट्रीय सण एवढे काय ते जाणतात महाविद्यालयात एक औपचारिकता म्हणून झेंडावंदन झाले की मित्र मैत्रिणी बरोबर फिरणे पार्टी करणे आणि सुट्टीचा उपभोग घेणे हीच काय त्यांची भावना झाली आहे.१५ ऑगस्ट चे महत्त्व तिरंगा,झेंडा त्यातील रंग त्यावर असलेले अशोक चक्र या कश्याची माहिती त्यांना दिसत नाही.१५ ऑगस्ट निमित्ताने होणाऱ्या राष्टपती व पतंप्रधान कोणाचे भाषण ऐकण्यात त्यांना रस दिसत नाही.देशभक्ती,देशप्रेम या संदर्भात त्यांचा संकल्पना ही विघातक आढळतात. १५ ऑगस्ट म्हणजे हक्काचा सुट्टीचा दिवस,१५ ऑगस्ट म्हणजे राष्ट्रीय सण,१५ ऑगस्ट म्हणजे ध्वजारोहन,१५ ऑगस्ट म्हणजे स्वांतत्र्यदिन या तटस्थ भावनां पलिंकडे कोणतीही भावना त्यांचा मनात येत नाही.

**१५ ऑगस्टच्या संदर्भात युवकांना फारसे गांभीर्य नसल्याची कारणे पुढील प्रमाणे जाणवतात**

- १५ ऑगस्ट दिनावैतिरिक्त स्वांतत्र्यविरांचा कार्याची युवकांनी चर्चा केलेली दिसत नाही.
- ब्रिटिशांच्या अत्याचाराचे गांभीर्य व परिणाम यासंदर्भातील अज्ञान.
- आजच्या राज्यकर्त्यांमधील आचार - विचारा मधील तफावत भष्ट्राचार व हिसांचारामुळे लयास गेलेली राष्ट्रप्रेम,राष्ट्रभक्तीची भावना.
- परंपरा व संस्कारातून १५ ऑगस्टच्या कार्यक्रमात आलेली यांत्रिकता.
- कार्यक्रम आयोजनामधील तटस्था व यांत्रिकता.
- १५ ऑगस्टच्या संदर्भात राजकीय पक्षांच्या विविध भूमीका.
- शाळांमध्ये व महाविद्यालयात कर्तव्य म्हणून पारपाडला जाणारा राष्ट्रीय कार्यक्रम.
- विद्यार्थ्यांचे इतिहास वाचनातील अनास्था.



Scanned with CamScanner

यासारख्या कारणांमुळे १५ ऑगस्ट संदर्भात युवकांना फारसे गांभीर्य जाणवत नाही.

**सारांश**

१५ ऑगस्ट हा आपला राष्ट्रीय सण आहे यात शंका नाही प्रत्येक शाळा,महाविद्यालयामध्ये १५ ऑगस्ट पूर्वी स्वांतत्र्यविरांची गाथा,तिरंगी झेंडयाचे महत्त्व व रचनेचा अर्थ स्पष्ट केला पाहिजे.हा सण साजरा करतांना त्यात येणारी [illegible] व तांत्रिकता नष्ट होवून या सणासंदर्भात विद्यार्थ्यांना औत्सुक्य निर्माण करणे अंत:प्रेरणेने तो साजरा करावा वाटेल [illegible] प्रयत्न व्हायला हवेत स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे याची कल्पना विद्यार्थ्यांना देण्यात यावी राष्ट्रभक्ती,राष्ट्रप्रेम [illegible] अचूक अर्थ विद्यार्थ्यांना सांगून ते मुल्य रुजविण्याचा वर्षभर प्रयत्न करण्यात यावा.शालेय अभ्यासक्रमात जेथे-जेथे [illegible] ऑगस्टचे महत्त्व एकात्मीक पध्दतीने तेथे-तेथे ते स्पष्ट करावे.पारतंत्र्य किती भहाव्यअसते याची कल्पना विद्यार्थ्यांना देण्यात यावी भष्ट्राचार अंहिसाचारा मुळे देशाची आधोगती होते त्याच बरोबर देश पुन्हा पारतंत्र्यात जावू शकतो, याची कल्पना विद्यार्थ्यांना दयावी स्वांतत्र्य आणि पारतंत्र्य या कल्पना सुस्पष्ट कराव्यात म्हणजे १५ ऑगस्टचे महत्त्व त्यांना समजेल आणि १५ ऑगस्ट हा आपला राष्ट्रीय सण देशातील सर्वबांधवानसह सर्व युवक उत्साहाने प्रेमाने व राष्ट्रीय भावनेने साजरे करतील असा विश्वास वाटतो. १५ ऑगस्ट म्हणजे केवळ राष्ट्रीय सण हा सण संविधानाने आपल्याला दिलेले अधिकार आपली कर्तव्य जाणीव करुन देणारे आहे. याचे भान सर्वांनी ठेवले पाहिजे असे आम्हाला वाटते.

संदर्भ


- htthttps://www.mapsofindia.com/on-this-day/date/08/15
- ps://en.wikipedia.org/wiki/Independence_Day_(India)
- https://www.indiacelebrating.com/essay/independence-day-essay/
- https://www.timeanddate.com/holidays/india/independence-day?starty=
- www.dnaindia.com/.../report-not-just-india-these-countries-also-celebrate-their-indepe...


Scanned with CamScanner